# नाशिक महानगरपालिका, नाशिक

संदर्भ :- वाचा :- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६

**- अग्निशमन व आणिबाणी सेवा -**

**- अग्निप्रतिबंधक दाखला -**

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६ नुसार (१३) १** दाखला देणेत येतो की **श्री. अभिजीत रमेश आहके** यांना त्यांची जागा **स.नं.१८६/१/२/१+१८६/१/२/२+१८६/२/३, मखमलाबाद मातोरी शिवरोड, मखमलाबाद, नाशिक.** या ठिकाणी **"मे. अंजनेय आयुर्वेद कॉलेज व हॉस्पिटल"** या व्यवसायासाठी खालील निर्मलिखित अटी-शर्तींच्या अधिन राहुन अग्निप्रतिबंधक दाखला देणेत येत आहे.

**अटी-शर्ती**

१. सदर दाखला हा फक्त मनपाने मंजुर केलेल्या नकाशावर हुकूम बांधकामासाठी दिलेला आहे.मंजुर कामाव्यतिरिक्त वाढीव बांधकाम व सामाजिक अंतरातील बांधकाम तसेच वापरात बदल केलेला असल्यास अशा अनधिकृत बदल झालेल्या इमारतीच्या भागास सदर दाखला लागू होणार नाही.

२. दाखला घेतलेनंतर सदर इमारतीच्या बांधकामात वा वापरात बदल करण्यात आल्यास वा वाढीव बांधकाम केल्यास असा बदल मनपा नगररचना खात्याकडुन मंजुर करुन घ्यावा लागेल तसेच केलेल्या बदलानुसार अग्निप्रतिबंधक व अग्निविमोचक उपाययोजनांमध्ये नियमांनुसार फेरबदल करणे दाखला धारकावर बंधनकारक राहील.

३. तळघर (बेसमेंट) चा वापर मनपा विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापरांसाठीच करता येईल. अन्य वापरासाठी सदरचा दाखला लागू होणार नाही. **सदर तळघरामध्ये निवासासाठी रुग्ण ठेवता येणार नाही.**

४. ज्या जागेसाठी अग्निप्रतिबंधक दाखला दिलेला आहे त्या ठिकाणी असलेली अग्निप्रतिबंधक व अग्निविमोचक उपाययोजना, उपकरणे, बाहेर पडण्याचे मार्ग, पाण्याचा साठा, आपत्कालीन मार्ग इ. नेहमी सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम 2006 नुसार मालक / भोगवटादार / दाखलाधारकाची असून त्याबाबत खात्री करुन घेणकामी वर्षातुन किमान एक किंवा दोन वेळा अचानक भेटी देवुन तपासणी करणेचा अधिकार राखुन ठेवलेले आहेत.

५. महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3 नुसार सदर ठिकाणी आवश्यक अग्निविमोचक व अग्निप्रतिबंधक उपाययोजना केलेली आहे. सुचित केलेनुसार योग्य ती उपाययोजना केलेली नसल्यास अथवा केलेली उपाययोजना वापरण्यास योग्य सुस्थितीत ठेवलेली नाही असे निदर्शनास आल्यास अग्निशामक दलाने दिलेल्या मुदतीत सदर उपाययोजना सुस्थितीत दाखलाधारकावर बंधनकारक राहील. तसे न केल्यास सदर दाखलाधारकांकडुन नियमानुसार दंड वसूल करणेत येईल किंवा महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 8, 36 व 38 नुसार कारवाई करणेत येईल.

६. अस्तित्वात आलेल्या अग्निप्रतिबंधक, अग्निविमोचक उपकरणे व यंत्रसामुग्रीच्या वापराबाबत दाखलाधारक व सदर ठिकाणी काम करणारे कर्मचारी यांना प्रशिक्षण असणे आवश्यक आहे.

७. महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3 (3) नुसार आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना दुरुस्त व कार्यक्षम असलेबाबतचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र **("बी" फॉर्म)** लायसन्स प्राप्त अभिकरणाकडुन प्राप्त करुन **अग्निशामक विभागाकडे वर्षातुन दोन वेळा जानेवारी व जुलै महिन्यामध्ये सादर करावे लागेल.**

८. सदरचा दाखला मा. नगररचना विभाग यांचे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला भागश: जावक क्र./ननिवि/ सीर/३१०१३/ २०२२ दिनांक १८/०८/२०२२ च्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

९. अस्तित्वात आलेल्या अग्निप्रतिबंधक व अग्निविमोचक उपकरणे व यंत्रसामुग्रीच्या वापराबाबत दाखला धारक व सदर ठिकाणी काम करणारे कर्मचारी यांना प्रशिक्षण माहिती असणे आवश्यक आहे.

**उपरोक्त अटींचा भंग झालेचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करणेत येईल.**

**हा दाखला दिनांक ३१/१२/२०२३ पावेतो अंमलात राहील.**

**दिनांक - ०९/१२/२०२२**

| दाखला फी | | |
|---|---|---|
| बुक नं. | - | ८५७ |
| पास नं. | - | ००००१८ |
| र.रुपये. | - | ३५,४७३/- |
| दिनांक. | - | ०८/१२/२०२२ |

(संजय बैरागी)
मुख्य अग्निशमन अधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक

TRUE COPY

Scanned with OKEN Scanner

तथापि जानेवारी व जुलै महिन्यामध्ये लायसन्स प्राप्त अभिकरणाकडून फॉर्म "बी" प्राप्त करून सादर केलेबाबतच्या नोंदीवरून घेणे बंधनकारक राहील.

| अ.नं. | वर्ष | रक्कम रुपये | वार्षिक फी भरलेचा तपशिल बुक नं. / पा.नं. दिनांक | तपासणी केलेबाबत अनुज्ञप्तीधारक अभिकर्ता यांचे नांव व फॉर्म "B" यांचा दाखला दिनांक | सही |
|---|---|---|---|---|---|
| १) | २०२३ | रु. ९०००/- | बुक नं: ०७५९१० पावती नं: ३० दि: २०/४/२०२३ | मे. अथर्व एंटरप्राइजेस फॉर्म-B दि: १०/०४/२०२३ | [signature] मुख्य अग्निशमन अधिकारी नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| | | | "बी" फॉर्मची नोंद घेतली. | | |
| २) | २०२४ | ९०००/- | बुक नं. २५५८ पावती क्र. ००१५ दि. ३/४/२०२४ | मे. अथर्व एन्टरप्रायजेस फार्म B दि. १५/३/२०२४ | [signature] 3/4/24 मुख्य अग्निशमन अधिकारी नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| | | | "बी" फॉर्मची नोंद घेतली. | | |
| ३) | २०२५ | ९०००/- | बुक क्र. ८०८८ पावती क्र. ८६८६ दि. २२/४/२०२५ | मे. अथर्व एन्टरप्रायजेस फार्म B दि. ११/३/२०२५ | [signature] 22/4/25 मुख्य अग्निशमन अधिकारी नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| | | | | "बी" फॉर्मची नोंद घेतली. | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

TRUE COPY
[signature]
Principal
Ayurved College and Hospital, Nashik

Scanned with OKEN Scanner